महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
विशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात** **दिनांक :- २६ सप्टेंबर, २०२४**

# -: शुद्धिपत्रक :-

## महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४
## (जाहिरात क्रमांक ४१४/२०२३, दिनांक २९ डिसेंबर, २०२३)

**महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा**-२०२४ करीता दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी विविध संवर्गांच्या एकूण २७४ रिक्त पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षित पदसंख्या नमूद करून एकूण ५२४ पदांचे शुद्धिपत्रक दिनांक ८ मे, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. तदनंतर शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे क्र. कृषिआ १०२३/प्र.क्र.२१९/१६-ए, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या पत्रासोबत महाराष्ट्र कृषी सेवा-२०२४ करिता २५८ पदांचे मागणीपत्र आयोगास प्राप्त झाले. सदर पदांचा समावेश महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ मध्ये करण्याबाबत शासनाकडून विनंती करण्यात आली होती. सदर विषयासंदर्भात मा. आयोगाची दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र कृषि सेवेतील पदांचा समावेश महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ मध्ये करण्यात येत आहे. प्रस्तुत पूर्व परीक्षा आयोगाच्या दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार सुधारित दिनांकास म्हणजेच **रविवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२४** रोजी आयोजित करण्यात येईल.

**२.** शासनाकडून महाराष्ट्र कृषी सेवेकरिता प्राप्त मागणीपत्रानुसार **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा- २०२४** परीक्षेमधून **महाराष्ट्र कृषि सेवेच्या** भरावयाच्या एकूण **२५८** पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(चार) महाराष्ट्र कृषि सेवा - कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (एकूण २५८ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| **(१)उप संचालक, कृषि, गट-अ (एकूण ४८ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. आणि शै. मागास वर्ग.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ५ | ३ | ३ | २ | ३ | १ | ६ | -- | ५ | ५ | ३३ | १५ | ४८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ४ | २ | २ | १ | २ | १ | ४ | -- | ४ | ४ | २४ | ९ | ३३ |
| (२) महिला | १ | १ | १ | १ | १ | -- | २ | -- | १ | १ | ९ | ५ | १४ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०२ पदे** - [(१) **०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision),(२) **०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing) ] | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| **(२) तालुका कृषि अधिकारी/तंत्र अधिकारी, गट-ब (एकूण ५३ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. आणि शै. मागास वर्ग** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ७ | ७ | -- | १ | २ | ५ | १५ | ३ | ५ | ५ | ५० | ३ | ५३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ५ | ५ | -- | १ | १ | ४ | ९ | २ | ४ | ४ | ३५ | २ | ३७ |
| (२) महिला | २ | २ | -- | -- | १ | १ | ५ | १ | १ | १ | १४ | १ | १५ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | १ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०२ पदे**- [(१) **०१ पद**-अंध/अल्पदृष्टी (Blind/Low Vision),(२) **०१ पद**-कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing) ] | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | **एकूण ०१ पद – संस्थात्मक** | | | | | | | | | | | | |
| **(३) कृषि अधिकारी, कनिष्ठ व इतर, गट-ब, (एकूण १५७ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. आणि शै. मागास वर्ग.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | २ | ३ | २ | -- | ७ | ५ | ६५ | ३ | १६ | १६ | ११९ | ३८ | १५७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | २ | १ | -- | ५ | ४ | ४३ | २ | १० | १० | ७८ | २५ | १०३ |
| (२) महिला | १ | १ | १ | -- | २ | १ | १९ | १ | ५ | ५ | ३६ | ११ | ४७ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ | -- | १ | १ | ५ | २ | ७ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०६ पदे** - [ **०२ पदे** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०२ पदे** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), **०१ पद** - अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy), **०१ पद** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व] | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | **एकूण ०२ पदे – [ ०१ पद – संस्थात्मक, ०१ पद- संस्थाबाह्य ]** | | | | | | | | | | | | |

**३. पात्रता :-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा :-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय अमागास / मागासवर्गीय/ आ. दु. घ. | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | |
| १ एप्रिल, २०२४ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | | ४५ |

**३.३** मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू उमेदवार यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

**३.४ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सनिव-२०२१/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्ष इतकी शिथिलता देण्यात येत आहे.**

**३.५** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४. शैक्षणिक अर्हता :-**

**४.१ महाराष्ट्र कृषिसेवा :-**

**(१)** मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्याच विद्याशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.

**(२)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय, कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : आकृवि-१२११/प्रक्र २०८/१५ए, दिनांक ७ सप्टेंबर, २०११ अन्वये खालील शैक्षणिक अर्हता बी.एसस्सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत :-

(१) बी.एसस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान)
(२) बी.एसस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन)
(३) बी.एसस्सी (गृह विज्ञान)
(४) बी.टेक (अन्नतंत्र)
(५) बी.एफ.एसस्सी.
(६) बी.एसस्सी. (उद्यानविद्या)

**(३)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक: मकृप १०२१/प्र.क्र.६३/७अ, दिनांक २२ एप्रिल, २०२१ अन्वये बी. एससी (ऑनर्स) कृषि या पदवीशी समतुल्य ठरविण्यात आलेल्या खालील पदव्यांचा समावेश करण्यात येत आहे:-

(१) बी. एससी (ऑनर्स) उद्यानविद्या,
(२) बी. एससी (ऑनर्स) वनविद्या,
(३) बी. एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान,
(४) बी. एफ.एससी (मत्स्य विज्ञान),
(५) बी. टेक (कृषि अभियांत्रिकी),
(६) बी. टेक (अन्नतंत्रज्ञान),
(७) बी. टेक (जैवतंत्रज्ञान),
(८) बी. एससी. (एबीएम)/ बी. बी. एम (कृषि)/ बी. बी. ए.(कृषि)/ बी. एससी (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन

**४.२** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**४.३** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली पाहिजे.

**४.४** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**५. दिव्यांग आरक्षण सुनिश्चिती:-**

शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र. कृषिआ-२५१९/प्र.क्र./१६ए, दिनांक ०६ मे, २०२२ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती / उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत :-

(a)Blind, Low Vision (b) Deaf, Hard of Hearing (c) One Arm, One Leg, One Arm & One Leg, Both Legs, spinal deformity(SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction, Cerebral Palsy, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victims, (d)Autism Spectrum Disorder (M, Mod), Intellectual Disability, Special Learning Disability, Mental Illness (e) Multiple Disabilities (a) to (d) above

**६.** महाराष्ट्र नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ करीता यापूर्वी अर्ज सादर केलेला नाही, तथापि, शैक्षणिक अर्हतेनुसार महाराष्ट्र कृषि सेवेकरीता पात्र आहेत, अशा उमेदवारांकडून महाराष्ट्र नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ मधील महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षेकरीता नव्याने अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**७.** नव्याने अर्ज करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांना फक्त महाराष्ट्र कृषि सेवेकरीता अर्ज सादर करता येईल.

**८.** नव्याने अर्ज करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक व शैक्षणिक अर्हता ही मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसार गणण्यात येईल.

**९.** महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा २०२४ करीता यापूर्वी अर्ज सादर केलेल्या तसेच शैक्षणिक अर्हतेनुसार महाराष्ट्र कृषि सेवेकरीता देखील पात्र ठरतात, फक्त अशा अर्हताप्राप्त उमेदवारांकरीता महाराष्ट्र कृषि सेवेकरीता विकल्प सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार उमेदवारांनी महाराष्ट्र कृषि सेवेकरीता विकल्प सादर करणे आवश्यक राहील.

**१०.**आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ परीक्षेमधील महाराष्ट्र कृषि सेवेकरीता विकल्प निवडणाऱ्या तसेच नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

**(१)** महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा २०२४ मधील फक्त कृषि सेवेकरीता नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी "Online Application " सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या "Check Eligibility" बटनावर क्लिक करुन अर्ज सादर करण्याची पुढील कार्यवाही करावी.

(२) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा २०२४ करीता **यापूर्वी अर्ज सादर केलेले व शैक्षणिक अर्हतेनुसार कृषि सेवेकरीता देखिल पात्र आहेत अशा उमेदवारांनी कृषि सेवेकरीता विकल्प सादर करण्यासाठी** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीसमोर (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या " View " बटनावर व त्यानंतर "Recheck Eligibility" बटनावर क्लिक करून " उजव्या बाजूकडील स्तंभामधील" कृषि सेवेतील ज्या संवर्गाकरीता अर्ज करू इच्छितात त्यावर क्लिक करून "Apply व Submit" बटनावर क्लिक करावे. प्रस्तुत विकल्प सादर करणाऱ्या उमेदवारांना पुन्हा परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

(३) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ मधील महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षेसाठी दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील सेवेसाठीचा दावा तसेच प्रस्तुत सेवेचा दावा कायम समजण्यात येईल. सदर विकल्प सादर करताना मूळ अर्जातील दाव्यांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

(४) महाराष्ट्र कृषि सेवेकरिता दावा करण्यासाठी विहित पद्धतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणाऱ्या उमेदवारांचा प्रस्तुत पूर्व परीक्षेकरीता यापूर्वी अर्ज सादर करताना निवडलेल्या सेवांसाठीचा दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(५) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ मधील महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षेकरिता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालील कालावधीत करणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज/विकल्प सादर करण्याचा कालावधी | **दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२४ रोजी २३:५९** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक १७ ऑक्टोबर, २०२४ रोजी २३:५९** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | **दिनांक १९ ऑक्टोबर, २०२४ रोजी २३:५९** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक २१ ऑक्टोबर, २०२४** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**११**. महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षेकरिता **वयोमर्यादा** गणण्याचा दिनांक हा मूळ जाहिरातीमधील तरतुदीनुसार म्हणजेच **दिनांक १ एप्रिल, २०२४** असा राहील.

**१२**. **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा**-२०२४ च्या मूळ जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्ज सादर करताना अपलोड करावयाच्या सर्व कागदपत्रांसंबंधीच्या तरतुदी प्रस्तुत शुद्धिपत्रकाकरिता लागू राहतील. सदर तरतुदीनुसार उमेदवारानी कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

**१३.प्रस्तुत शुद्धिपत्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा** - २०२४ मधील पदसंख्येत बदल/सुधारणा झाल्यामुळे विषयांकित परीक्षेमधून एकूण ७८२ पदांकरीता भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

**१४**. पूर्व परीक्षेच्या निकालाधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

**१५**. प्रस्तुत शुद्धिपत्रकास अनुसरून **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा** - २०२४ मधील महाराष्ट्र कृषि सेवेकरीता नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना फक्त **अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे** जिल्हा केंद्रावरील परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**१६**. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ च्या आयोजनाच्या सुधारित दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

**१७**. दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरात तसेच जाहिरातीच्या अनुषंगाने प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग